# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **AHTU, Washim**

**Date of Good Work done** :- **21/05/2023**

**Brief of the work done** :-

हरविलेल्या अल्पवयीन मुलीस शोधून केले आई - वडिलांच्या स्वाधीन ; पो.स्टे. कारंजा शहर पोलीसांची कामगिरी.

# हरविलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेतला शहर पोलिसांनी

## मुलगी आई वडीलांच्या ताब्यात देण्यात आली

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ▪ शहरातील शांतीनगर परीसरातील अल्पवयीन कुमारिका मुलगी १९ एप्रिल रोजी घरून बेपत्ता झाली आहे. तीचा शोध घेतला असता आढळून आली नाही शहर पोलीसांनी या प्रकरणी कशोसीने तपास करून घरून निघून गेलेल्या मुलीचा शोध तिच्या कारंजा येथील मित्रांसह मध्य प्रदेशातील छिंदवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत परासीया येथून ताब्यात घेवून कारंजा शहर पोलीस स्टेशन येथे आणून मुलीला आईवडीलांच्या ताब्यात देण्यात आले.

या बाबतचे वृत्त असे की, पोलीस स्टेशन कारंजा शहर जि.वाशिम येथे २२ एप्रील२३ रोजी अर्जदार राजर्षी प्रमोद महाजन यांनी तक्रार अर्ज दाखल केला की, त्यांची मुलगी कु. ही १९ एप्रील२०२३ रोजी शांती नगर कारंजा येथुन निघुन गेली असुन तिचा आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन येत नाही. अशा अर्जावरून मिसींग क्र. १३/२३ प्रमाणे दाखल करून तिचा शोध घेणे कामी ठाणेदार आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनात तपास पथक पोहेकॉ संदीप , पोना. अजय , पोकॉ मनिष असे नेमुन अमरावती करीता रवाना करण्यात आले होते. सदर ठिकाणी हरवलेली मुलगी मिळुन न आल्याने सदरची मुलगी ही मध्य प्रदेश मध्ये असल्याची गोपनिय माहीती मिळाल्यावरून पुन्हा पोलीस निरीक्षक गजानन धंदर तसेच आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनात दुसरे तपास पथक पोलीस नाईक उमेश बिबेकर , पोकॉ. नितीन पाटील ,महीला पोकॉ वंदना इंगोले असे तयार करून पोलीस अधिक्षक बच्चनसिंग वाशिम यांच्या आदेशाने सदर चे तपास पथक ०३ मे २३ रोजी मध्य प्रदेश करीता रवाना झाले. त्यांनी सदर ची हरवीलेली मुलगी कु. हीचा जिल्हा छिंदवाडा पो.स्टे. परासिया मध्य प्रदेश येथे जावुन कसोशीने शोध घेतला असता हरवीलेली मुलगी ही तिचा कारंजा येथील मित्र याचे सोबत मिळुन आल्याणे त्यांना पो.स्टे. कारंजा शहर येथे आनण्यात आले असता तिचे आई वडील तसेच नातेवाईक यांनी पोलीसांचे आभार मानले.

तसेच ईतर ही हरविलेल्या इसमांना पोलीस स्टेशन कारंजा शहर हे कसोशीने शोध घेत आहेत. सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक बच्चनसिंग वाशिम, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदिश पांडे , तसेच पो. नि. आधारसिंग सोनोने, गजानन धंदर यांच्या मार्गदर्शनात पोलीस नाईक उमेश बिबेकर , पोकॉ. नितीन पाटील , महीला पोकॉ वंदना इंगोले यांनी केली आहे. (ता.प्र.)